**विशेष दिवाणी दावा क्र. ४४/२०२२.**
**नि.क्र. ४६.**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ विलास केशव शेळके यांचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ चे विधीज्ञ श्री. ए. टी. हजारे यांचेमार्फत शपथेवर सुरु :—**

२. मी ८वी पास आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर प्रकरणात दाखल केलेला पुराव्याकामी प्रतिज्ञालेख हा माझया वकिलांनी तयार करून ठेवला होता व मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, माझया पुराव्याकामी प्रतिज्ञालेखातील मजकूर हा माझया सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १, ३, ४ व ५ हे माझे सख्खे भाउ आहेत आणि प्रतिवादी क्र. ६ ते ८ या माझया बहिणी आहे. हे म्हणणे खरे आहे की, सेंट लुक हॉस्पीटल, श्रीरामपूर येथे वाहन चालक या पदावर कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मला मासिक वेतन हे ७ ते ८ हजार रूपये होते. मला १० हजार रूपये दरमहा वेतन होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मासिक वेतनावर माझे संपूर्ण कुटुंब विसंबून होते. हे म्हणणे खरे आहे की, या व्यतिरिक्त माझे दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी नोकरीला लागल्यापासून मी माझया कुटुंबासह शिरसगाव, ता. श्रीरामपूर येथे स्वतंत्र राहात होतो व आमचे रेशन कार्ड देखील स्वतंत्र होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दारूच्या व्यसनामुळे सन २०१४ मध्ये कामावरून काढून टाकण्यात आले होते. मी सन २०१४ मध्ये स्वत:हून राजीनामा दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, राजीनामा देताना त्यात कारण नमूद करावे लागते. मी राजीनामा देताना माझ्या मोठया भावाने विनंती केल्यामुळे राजीनामा देत आहे असे कारण टाकले होते. मी माझ्या राजीनाम्याची प्रत दाखल करू शकतो. सन २०१४ मध्ये राजीनामा दिल्यानंतर मला अंदाजे ३,५०,०००/— रूपये रक्कम मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, राजीनामा दिल्यानंतर देखील मी शिरसगाव, ता. श्रीरामपूर येथे राहात होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतंत्र राहात असून देखील प्रतिवादी क्र. १ विनायकने मला शिरसगाव येथे घर घेण्यासाठी आर्थिक मदत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे इतर भाउ हे देखील स्वतंत्र राहात होते. हे म्हणणे खरे आहे

की, आम्ही भाउ स्वतंत्र राहात असताना माझी आई रत्नमाला व प्रतिवादी क्र. ४ बापू हे दावा मिळकत मालमत्ता क्र. ४११ मधील घरात राहात होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ विनायक पायाने अपंग आहे. हे मला माहित नाही की, विनायक एम.पी.एस.सी. परीक्षा पास होवून मंत्रालयात उच्च पदावर काम करीत होता. हे मला माहित नाही की, विनायकची पत्नी देखील नोकरीस होती. हे म्हणणे खरे आहे की, विनायक व त्याची पत्नी नोकरी निमित्त बाहेरगावी राहात होते. हे म्हणणे खरे आहे की, विनायकला अनिरूध्द हा एकुलता एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१७ मध्ये प्रतिवादी क्र. १ हा बायको व मुलाला घेवून गावी येवून राहू लागले. हे म्हणणे खरे आहे की, ते गावी आले त्यावेळी अनिरूध्द याला नोकरी नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने अनिरूध्दला गट क्र. २२ मध्ये पोल्ट्री फार्म टाकून दिले. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २२ हा सामायिकात असल्यामुळे आम्ही सर्व वादी प्रतिवादींनी विनायकला पोल्ट्री फार्म टाकण्याकरिता ग्राम पंचायत कार्यालयात संमती दिली. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हा पासून पोल्ट्री फार्मची जागा प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीच्या दक्षिणबाजूला मी आज रोजी वहीवाट करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडिल हयात असताना त्यांनी आम्हासर्व भावांमध्ये तोंडी वाटप करून दिले. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी प्रतिवादी क्र. २ ते ७ यांच्या हिश्यातील क्षेत्र प्रतिवादी क्र. १ विनायक च्या ताब्यात आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, सर्वच क्षेत्र प्रतिवादी क्र. १ च्या ताब्यात आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ७ यांनी प्रतिवादी क्र. १ च्या लाभात त्यांच्या हिश्याचे क्षेत्रासंदर्भात हक्कसोडपत्र करून दिले आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते हक्कसोडपत्र मला मान्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, हक्कसोड पत्रावरून करण्यात आलेल्या फेरफार क्र. ६२८१ ला मी आजपर्यंत कुठेही आव्हाण दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ला पोल्ट्री व्यवसाय टाकण्याकरिता ५० ते ६० लाख रूपये खर्च आला. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ने तो खर्च कसा केला हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मुलांच्या

शिक्षणासाठी व लग्नासाठी प्रतिवादी क्र. १ ने मला आर्थिक मदत केली होती. हे म्हणणे खरे आहे की, पोल्ट्री व्यवसाय सुरू केल्यानंतर त्याबाबतचा ग्रामपंचायतचा उतारा मी सदर प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पोल्ट्रीच्या जागेवरील हिश्यावर हक्क सांगावयाचा नसलामुळे मी त्याबाबतचा उतारा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी केवळ दावा मिळकतीमधील उत्पन्नाचा हिस्सा मागितला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ मध्ये मी माझा अविभक्त हिस्सा मागितला आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ ला प्रतिवादी क्र. १ सोबत माया विनायक शेळके असे दोन नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दाव्यात माया विनायक शेळके हिला प्रतिवादीपणात सामिल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ हि गावठाण हद्दीत येते. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ ला स्वतंत्र सिटी सर्व्हे क्रमांक आहे. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ च्या सिटी सर्व्हे क्रमांकावर माझ्या वडिलांचे व त्यांच्या भावांची नावे सहकब्जेदार म्हणून नमूद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ चा सिटी सर्व्हे उतारा मी या दाव्यात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४११ च्या सिटी सर्व्हे उता—यावरील सहकब्जेदारांना मी सदर दाव्यात पक्षकार म्हणून सामिल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्र. २७ मध्ये वादी व प्रतिवादी व्यतिरिक्त इतर सह कब्जेदार आहेत व मी त्यांना सदर दाव्यात पक्षकार केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट क्र. २७ मध्ये वादी व प्रतिवादी तसेच इतर सह कब्जेदारांमध्ये अघाप वाटप झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. २७ मध्ये वादी व प्रतिवादींच्या नावावर स्वतंत्र क्षेत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. २२ च्या दक्षिण बाजुला शिव रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यात दावा मिळकतींच्या दिलेल्या चतु:सीमा चुकीच्या आहेत. माझ्यात व प्रतिवादी क्र. १ मध्ये कधी वाद झाले ते मला सांगता येईल. आमच्यात सन २०२० मध्ये वाद झाले व त्यावरूनच मी

सदरचा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

**<u>नि. क्र. ५९ वर पारीत आदेशानुसार प्रतिवादी क्र. ८ तर्फे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.</u>**

**<u>सा.वा.दा.ब.अ.क.के.</u>** **श्रवणोत्तर स्विकृती**

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2025.07.24 15:16:40 +0530

JOSHI PRASAD BALKRISHNA
Digitally signed by JOSHI PRASAD BALKRISHNA
Date: 2025.07.24 15:16:43 +0530

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर, संगमनेर.**
**दि. २४/०७/२०२५.**

**( पी.बी. जोशी )**
**५वे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**संगमनेर.**